# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामिण), नागपूर
# दिनांक ११/०६/२०२३ (रविवार)

---

## धान्य चोरी करणा–या आरोपविरूध्द कारवाई

**पोलीस स्टेशन काटोल** :–अंतर्गत आयुडिपी काटोल १ किमी पुर्व, यातील फिर्यादीचे बंद गोडावुन मधुन तुरीचे ९ कट्टे प्रत्येकी ६० किलो किंमती ६,०००/–रू कट्टा असा एकुन ५४,०००/–रू चा माल दिनांक २९.०५.२३ ते १०.०६.२३ चे ०१.०० ते ०७.०० वा दरम्यान यातील नमुद आरोपीतांनी चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– तुषार दत्तरावजी राजुरकर वय ३५ रा आयुडिपी काटोल जि नागपुर मो क्र ९३७३०४८२३४ यांचे रिपोर्टवरुन पोस्टे काटोल येथे आरोपी नामे– धनपाल सोनटक्के रा रामपठार ता काटोल २) राकेश वरटी रा. काटोल यांचे विरूध्द कलम ३८० भादवी अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास विकास वाइलकर पोस्टे काटोल मो क्र ८८८८०५३५४२ हे करीत आहे.

## दुखापत

**पोलीस स्टेशन कळमेश्वर** :– अंतर्गत लोणारा ०९ किमी दक्षिण. येथे फिर्यादी यांचेकडे वडीलोपार्जीत एकुण १० ऐकर शेती असुन, त्या शेतीमध्ये फिर्यादीचे वडील व मोठे वडील रमेश डेहनकर यांचा हिस्सा आहे. शेताची हिस्से वाटणी झालेली नाही. त्या कारणावरून त्यांचेत वाद होत असतात. दि. ०९/०६/२३ रोजी रात्रीला ०८:३० वा. फिर्यादी आपले घरी हजर असता, फिर्यादीचे मोठे वडीलांचा मुलगा– आरोपी सतीश डेहनकर हा घराचे समोर आला. व शेतीचे कारणावरून फिर्यादीस शिवीगाळी करित होता. यावर फिर्यादीने त्यास “तुला त्रास असेल तर शेताची हिस्से वाटणी करून टाक.” असे बोलला असता, आरोपीने फिर्यादीस काठीने उजवे हाताचे कोहनीवर व उजवे बाजुला कमरेवर मारून जखमी केले. तसेच शेतात पुन्हा दिसला तर जिवाने मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– गणेश ज्ञानेश्वर डेहनकर वय २५ वर्ष रा. लोणारा कळमेश्वर मो. ७०२०६३४६५६ यांचे रिपोर्टवरुन पोस्टे कळमेश्वर येथे कलम ३२४,५०४,५०६ भादवी अन्वयें चा गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास स.फौ./सुनिल मिश्रा मो. ९९२३६९४४६७ हे करीत आहे.